**प्रेसनोट** **दिनांक १८/०५/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

## तडीपार आदेशाचे उल्लंघन केलेल्या इसमास अटक.

मा.पोलीस उपआयुक्त सो, परि. ०१ पुणे शहर यांचे कार्यालयाकडील तडिपार आदेश क्रमांक १६/२०१९ दिनांक १६/०३/२०१९ रोजी अन्वये समर्थ पोलीस ठाणे हद्दीतील गुंड इसम नामे सागर भुजंग नायडु,वय २३ राहणार फ्लॅट नं. २४१ दुसरा मजला, सदाआनंद नगर, प्लॉट नंबर ०४ मंगळवार पेठ, पुणे याला पुणे शहर व पुणे जिल्हयातुन ०२ वर्षा करिता तडीपार केले होते.

दि.१४/०५/२०१९ रोजी समर्थ पोलीस स्टेशनकडील सर्व्हेलन्स पथकातील कर्मचारी पोलीस नाईक अजित गोरखनाथ शिंदे व पोलीस हवा.थोरात यांना समर्थ पोस्टे हद्दीत ११/०० ते १४/०० दरम्यान पेट्रोलिंग करत असताना सदानंदनगर, मंगळवार पेठ पुणे या भागात आले असताना त्यांना पाहुन एक इसम जोरात पळु लागल्याने त्यास त्यांनी पाठलाग करुन पकडले असता तो शरिराविरुद्ध गुन्हे करणारा समर्थ पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार असल्याचे आढळुन आले.

त्यांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध तडीपार आदेशाचा भंग केलेबाबत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये सरकारतर्फे फिर्याद नोंदवुन गुन्हा रजिस्टर नंबर १५१/२०१९ अन्वये समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली आहे.